# महाराष्ट्र गीत

बहुत असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥ ध्रु. ॥

गगनभदि गिरिविण अणु नच जिथें उणें
आकांक्षांपुढति जिथें गगन ठेंगणें
अटकेवरिजेथील तुरंगिं जल पिणें
तेथ अडे काय जलाशयनदांविणें ?
पौरूषासि अटक गमे जेथ दुःसहा ॥ १ ॥

प्रासाद दशास जेथ हृदयमंदिरें
सद् भावांचीच भव्य दिव्य आगरें
रत्नां वा मौक्तिकांहि मूल्य मुळिं नुरे
रमणीची कूस जिथें नृमणिखनि ठरे
शुध्द तिचें शीलंहि उजळवि गृहा गृहा ॥ २ ॥

नग्न खडग करिं, उघडे बघुनि मावळे
चतुरंग चमूचेंही शौर्य मावळे
दौडत चहुंकडुनि जवें स्वार जेथले
भासति शतगुणित जरी असति एकले
यन्नामा परिसुनि रिपु शमितबल अहा ॥ ३ ॥

विक्रम वैराग्य एक जागिं नांदती
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म-राजकारण समवेत चालती
शक्तियुक्त एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ॥ ४ ॥

गीत मराठयांचे श्रवणीं मुखीं असो
स्फूर्ति दीप्ति धृतिहि देत अंतरी ठसो
वचनिं लेखनींहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्र धर्ममर्म मनिं वसो
देह पडो तत्कारणिं ही असो स्पृहा ॥ ५ ॥

कवी : श्रीपाद कृष्ण कोल्हटकर